

# शिक्षण संधी एक मूलभूत हक्क

स्त्री खऱ्याखुऱ्या अर्थाने स्वतंत्र व्हायची असेल तर ज्या अनेक क्षेत्रात तिने प्रगती करणे आवश्यक आहे त्यापैकी शिक्षण हे एक आहे. शिक्षणाची संधी मिळणे हा प्रत्येक मानवाचा व म्हणून प्रत्येक स्त्रीचा मूलभूत हक्क आहे. शिक्षणापासून वंचित ठेवणे हा, दलित व इतर शोषित वर्गांप्रमाणेच, स्त्रियांवरील एक मोठा अन्याय आहे.

कायद्याने जरी मुलामुलींना शिक्षण घेण्याचा सारखाच हक्क असला तरी प्रत्यक्षात मुलींच्या शिक्षणाला या समाजात दुय्यम स्थान दिले जाते. मुलांचे प्रथम कर्तव्य ' स्वतःच्या पायावर उभे राहाणे ' आणि मुलीचे ' चांगला नवरा मिळविण्यासाठी घरकामात हुषार, मिळूनमिसळून राहणारी, सहनशील वगैरे बनणे ' असे मानले जाते.

अगदी गरीब स्तरात तर मुलांचे शिक्षणही नावालाच होते, मग मुलींच्या शिक्षणाचा प्रश्नच कोठे येतो ! या स्तरात, कुटुंबातील जवळजवळ प्रत्येक माणसाने कोणत्या ना कोणत्या प्रकारे मोलमजूरी केल्याशिवाय हातातोंडाची गाठ पडणे कठीण असते.

ज्या काही थोड्याशा मुलींना शिक्षणाची संधी मिळते त्यांच्याकडूनही त्यांनी स्वतःचा व समाजाचा विकास घडवून आणावा व त्यादृष्टिने समाजासाठी, विशेषतः स्त्रियांसाठी आपल्या शिक्षणाचा उपयोग करावा अशी अपेक्षा नसते. तर लग्नाच्या बाजारात चांगला सौदा पटावा म्हणून किंवा ' गरज ' पडल्यास शिक्षणाचा उपयोग करुन नोकरी करता यावी म्हणून मुलींना शिक्षण दिले जाते.

ही परिस्थिती बदलण्यासाठी खालील गोष्टी घडल्या पाहिजेत.

१) शिक्षणाची व शिक्षणाचा वापर करण्याची समान संधी मिळाली पाहिजे.

प्रत्येक मुलीला अगर स्त्रीला आपल्या आवडीप्रमाणे

त्यांनी भावाच्या मताचे खंडनही केलेले दिसते. ह्या पत्रात दिसणारे सावित्रीबाईंचे रूप फार तेजस्वी आत्मनिर्भर असे वाटते. स्त्रीमुक्तीच्या लढ्याचा अंतिम प्रवाह हा सर्वांगीण मानव–मुक्तीशी जोडावा लागेल. ह्याचे प्रत्यंतर ज्योतिबा–सावित्रीबाई जोडीत दिसते. स्त्री विरुद्ध पुरूष असा पवित्रा घेऊन प्रत्येक पुरुषाला पुरुषा परंपरेचा वाहक मानून एकाकीपणे हा लढा लढविणे हिताचे होणार नाही. कारण मग आज जाग आलेल्या सुशिक्षित स्त्रियांची मनेही ह्याच पुरुषप्रधान संस्कारांमधून घडली आहेत व म्हणूनच केवळ त्या प्रतिक्रियात्मक विचार करीत आहेत असेही कोणी म्हणल्यास वावगे होणार नाही.

विचार आणि कृती ह्यातील अद्वैत हा आणखी एक विशेष सावित्रीबाईंच्या चरित्रात आढळतो. काशीबाई ह्या तरूण विधवा ब्राह्मणबाईच्या पोटी अनौरस जन्मलेल्या मुलाला सावित्राबाईंनी दत्तक घेतले. स्वतःला मूल झाले नाही तेव्हा हसतमुखाने दुसरे लग्न लग्न करायची परवानगी ज्योतिबांना सावित्रीबाईंनी दिली त्यावेळी किंवा जोतिबांना साथ देण्यासाठी घरातली एकही चीजवस्तू न घेता घराबाहेर पडताना सावित्रीबाई आपल्या अंगभूत तेजाने चमकताना दिसतात.

विधवा पुर्नविवाह, बालहत्या–प्रतिबंधक गृह, स्त्रियां साठी शाळा ह्या सर्व कार्यक्रमात सावित्रीबाई स्वत कृतिशील राहिल्या. विचारप्रसार आणि स्वतःचे का ह्यातच सारे आयुष्य त्यांनी झोकून दिले. १८९ सालच्या महाराष्ट्राभर पसरलेल्या प्लेगच्या साथी रोग्यांवर उपचार करताना, त्यांची सेवा करतान सावित्रीबाईंना मृत्यू आला.

सावित्रीबाईंच्या काव्याचा उल्लेख न करता ह पुस्तक–परिचयाचा लेख पूर्ण होणार नाही. ह्या कवित तथाकथितदृष्टया कलात्मक नाहीत. पण अती सुंदर आहेत. शिक्षणाबद्दल, शूद्राबद्दल, जोतिबांबद्दल कवितेतून सावित्रीबाई लिहितात–

‘अडाणी जनाचा असे कर्णधार
तयांना असे देतसे सद्विचार
कृतीवीर होता तसा ज्ञानयोगी
स्त्रिया शूद्रांसाठी सदा दुःखभोगी’

जोतिबांना उद्देशून अभिमानाने लिहिलेल्या ह्या कवितेच्या ओळी सुंदर अन मार्गदर्शक आहेत.

जोतिबा–सावित्रीबाई दोघे मिळून पूर्ण मानवत्वाप्रत कसे गेले हे या ओळींतून चटकन समजते.

**विद्युत भागवत**

---

(पान १९ वरुन)

घेता येत असे. मुलींच्या शिक्षणाची मात्र काहीच सोय नव्हती. याचा अर्थ असा नव्हे, की स्त्रिया शिक्षित वा साक्षर नव्हत्या. काही कुळातील स्त्रियांना लिहिता वाचता येत असे. पण ते सर्व धार्मिक शिक्षणापुरते मर्यादित होते. सर्व कुटुंबाच्या कक्षेतच असे. स्त्रियांसाठी आधुनिक शिक्षणाचा प्रारंभ १९ व्या शतकाच्या प्रारंभीस मिशनऱ्यांनी उघडलेल्या शाळांमुळे झाला. पण या शाळांमध्येही उच्चवर्गवर्णाच्या स्त्रिया अतिशय कमी प्रमाणात जात. स्त्रियांवर रूढींची धार्मिक बंधने होतीच. इंग्रज शासनाने १८५४ पर्यंत स्त्री–शिक्षणाची जबाबदारी स्वीकारलेली नव्हती. १८५४ मध्ये वुडसाहेबाचा शिक्षणविषयक खलिता आला व मुलींच्या शाळांना प्रारंभ होऊ लागला. १८५४ साली सबंध मुंबई इलाख्यात पुरुषांसाठी २८७५ शाळा होत्या. त्यात एक लाखाहून अधिक विद्यार्थी होते. उलट महिलांच्या शाळा फक्त ६५ होत्या त्यात फक्त ३५०० मुली होत्या. त्यापैकी बहुसंख्य युरोपियन, अँग्लो इंडियन, ख्रिस्ती, पारशी समाजातील होत्या. स्त्री–शिक्षण अत्यंत मागासलेले होते. एकूण शिक्षणाची प्रगती मंद होती. त्यामध्ये स्त्री-शिक्षणाची प्रगती तर अत्यंत मंद होती. १८४८ साली फुल्यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली. ही शाळा ब्राह्मण मुलींप्रमाणेच शूद्रातिशूद्र मुलींसाठी होती. त्यामुळे स्त्री–शिक्षण व जातिभेद-विरोध या दोन्ही कारणांमुळे फुल्यांना मोठा विरोध सहन करावा लागला. सावित्रीबाईनाही फुल्यांनी शिकवले व त्याही शाळेत शिक्षिका म्हणून जाऊ लागल्या. यालाही समाजाचा विरोध होताच. सावित्रीबाईवर दगड फेक, शेणफेक झाली. गुंडांनी दम देण्यापर्यंत सामाजिक विरोध व्यक्त झाला. स्त्रियांना शिक्षण दिले तर स्त्रिया पुरूषांच्या डोक्यावर चढून बसतील असा सनातन्यांचा समज असे–त्यामुळे स्त्रीशिक्षणाला मोठ्या प्रमाणावर विरोध झाला.

एकंदरीत १९व्या शतकात सामाजिक व धार्मिक रूढी परंपरा याखाली सर्वसामान्य स्त्रीचे जीवन भरडत निघत होते! परंतु याच शतकात स्त्रियांच्या सामाजिक सुधारणांसाठी वैचारिक व सामाजिक संघर्षाला सुरुवात झाली! स्त्रीजीवनातील अंधार दूर होण्यास प्रारंभ झाला.

**–लता भिसे (शिराळकर)**

व कुवतीनुसार कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेण्याची संधी पुरुषांच्या बरोबरीने मिळाली पाहिजे. शिवाय ह्या शिक्षणाचा उपयोग आपल्या मर्जीनुसार करण्याची संधीही तिला पुरुषांच्या बरोबरीने मिळाले पाहिजे. नाहीतर शिक्षण घेण्यात तिला रस वाटणार नाही.

२) स्त्रीचा सामाजिक, आर्थिक प्रक्रियेत सहभाग असला पाहिजे–

कोणतीही व्यक्ती आपल्या शिक्षणाचा बोजा संपूर्णपणे उचलत नाही. सरकार म्हणजे पर्यायाने समाज. शिक्षणावर खर्च करुन त्यातील काही भाग उचलत असतो. तेव्हा प्रत्येक शिक्षित व्यक्ती ह्याबाबतीत समाजाचे ऋण लागते व कोणत्या ना कोणत्या प्रकारे तिने ते ऋण फेडले पाहिजे. ओघानेच ते ऋण फेडण्यासाठी प्रत्येक शिक्षित स्त्रीने कोणते ना कोणते काम पत्करुन सामाजिक, आर्थिक प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे. समाजाचे उत्पादन वाढविण्यास मदत केली पाहिजे.

३) अधिक कसदार शिक्षण दिले जावे–

सध्याच्या शिक्षणाचे स्वरुप चढाओढ, घोकंपट्टी करुन परीक्षेतून ' सुटण्या ' चे आहे. ते बदलून सर्वांगीण व अर्थपूर्ण शिक्षण मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. शिक्षण व्यवस्थित दिले जावे म्हणून शिक्षकांना पुरेसे पगार दिले जावेत. शिकविण्याच्या कामाव्यतिरिक्त इतर कामांमध्ये त्याना गुंतवायला नको. तसेच त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे आणि पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या सूचनांचा विचार व्हावा. ग्रामीण भागातील शिक्षिकांना स्त्री म्हणून संरक्षण मिळावे.

४) ग्रामीण विभागात शेतीचे शिक्षण द्यावे–

आपल्या देशातील ८० टक्के जनता खेडयामध्ये राहाते, तिचे जीवन शेतीशी निगडीत असते. म्हणून तेथील विद्यार्थी–विद्यार्थिनींना सर्वसाधारण शिक्षणाबरोबरच शेतीसंबंधीचे शास्त्रशुद्ध शिक्षण दिले पाहिजे अर्थात नुसते शिक्षण दिल्याने प्रश्न सुटणार नाही. तर त्या शिक्षणाचा उपयोग करणे शक्य झाले पाहिजे. त्यासाठी शेतकऱ्यांना जमिन, बी-बियाणे, खते, पाण्याची व्यवस्था या सर्व गोष्टी मिळाल्या पाहिजेत. शेतीविषयक शिक्षणाबरोबरच श्रमिकांची बेकारी दूर झाली पाहिजे. हे प्रश्न एकमेकांशी संबंधित आहेत.

(५) स्त्रियांसाठी व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाची सोय करावी–

घरात जसे पडेल ते काम बाईला करावेच लागते. तीच स्थिती घराबाहेरील कामात वाटयाला येते. शिक्षणाची, विशेषत: धंदेशिक्षणाची सोय नसल्यामुळे एकतर स्त्रियांना बेकार रहावे लागते नाहीतर मातीमोलाने दिवसभर राबावे लागते. केवळ अकुशल कामे स्त्रियांच्या वाटयाला येऊ नयेत म्हणून ग्रामीण व शहरातील तरुणींना निरनिराळ्या प्रकारचे व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण देण्याची खास सोय व्हावी. त्या शाळांना जोडून वसतिगृहे असावीत. कारण घरी राहून कोणतेही विशेष शिक्षण पुढे करणे आज तरी मुलींना शक्य होत नाही.

(६) मुलींची घरकामाच्या जबाबदारीतून सुटका केली जावी–

मुलींना नियमितपणे शाळेत जाता यावे म्हणून त्यांना मोलमजुरी करणे किंवा घर संभाळणे आवश्यक राहू नये. त्यासाठी सबंध कुटुंबाचे व्यवस्थित पोषण होऊ शकेल एवढा मोबदला त्यांच्या आईवडिलांना मिळावा. कामाच्या ठिकाणी, शेताजवळ त्यांची मुले संभाळण्याची सोय असावी. म्हणजे शाळा बुडवून लहान भावंडांना संभाळण्याचे काम मुलींना करावे लागणार नाही. यामुळे स्त्री शिक्षणाची संधी केवळ कागदोपत्री न, राहाता प्रत्यक्षात उतरायला मदत होईल.

(७) मुलींसाठी वसतिगृहांची सोय व्हावी–

दुय्यम व उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलींकरता मोठ्या प्रमाणावर व स्वस्त वसतिगृहे असावीत. गरीब मुलींची तर त्यामध्ये मोफत सोय व्हावी. त्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीचे मार्गदर्शन करू शकणाऱ्या स्त्रिया वसतिगृहाचं काम पहाण्यासाठी नेमल्या जाव्या. आपला शिक्षणखर्च भरून काढण्याच्या दृष्टीने या मुलींना दिवसातून काही तास काम करून पैसे कमविण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी. वसतिगृहात त्यांच्या आरोग्याचीही नीट देखभाल व्हावी. विद्यार्थिनींना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या आयुष्याच्या दृष्टीने जीवनोपयोगी शिक्षण दिले गेले पाहिजे.

(८) प्रौढ स्त्रियांनाही शिक्षण उपलब्ध व्हावे–

प्रौढ स्त्रियांच्या वेळेच्या सोयीने त्यांच्या शिक्षणाचे वर्ग घेतले जावेत. त्यांना लिहिणे, वाचणे शिकवले जावे. जगात वावरताना आवश्यक असणारे सामान्य ज्ञान मिळावे. कुटुंबाच्या खर्चाला हातभार लावण्याच्या दृष्टिने उपयोगी अशा घरगुती धंद्यांचे शिक्षण द्यावे.

(९) प्रत्येक स्त्रीला किमान शालेय शिक्षण मिळावे

आज स्त्रीला लहान सहान बाबतीतही दुसऱ्याच्या सल्ल्यावर अवलंबून रहावे लागते. तिला आत्मविश्वासही नसतो, योग्य शिक्षण मिळाल्यास ती आपल्या प्रश्नांबद्दल स्वतः विचार करू लागेल. त्यामुळे अन्याय सामाजिक रूढींपासून, धार्मिक अंधश्रद्धांपासून सुटका करून घेणे सुलभ होईल.

अर्थात वरील सर्व गोष्टी घडण्याच्या दृष्टीने योग्य दिशेने समाजपरिवर्तन घडवून आणले पाहिजे. कारण शिक्षण हा एकूण समाजव्यवस्थेचा अविभाज्य भाग असल्याने त्यांचा समाजव्यवस्थानिरपेक्ष विचार संभवत नाही.

## बिहार पोलिसांच्या पाशवीपणाचा कळस

बिहारमधील पोलिसांनी भागलपूर तुरुंगातील १८ ते २८ या वयोगटातील १० तरुणांना अज्ञात स्थळी नेले व ॲसिड टाकून त्यांना आंधळे केले. १० तरुणांपकी एका तरूणाचा पत्ता नाही. डोळे काढताना त्याचा प्राण गेला असावा असा कयास आहे. या घटनेवर देशात सर्वत्र तीव्र प्रतिक्रिया उमटली व शासनाला पोलिसांची चौकशी करण्याचे आदेश द्यावे लागले. शासन काही कारवाई करणार हे लक्षात येताच भागलपूर येथील पोलिसांनी आंदोलनाला प्रारंभ केला आहे. एक दिवसाचा बंदही त्यांनी पाळला. रेल्वे बंद ठेवल्या. यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे काही राजकीय पक्षांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. यात सत्ताधारी वर्गाचा समावेश आहे. बिहारच्या पोलिस आयुक्तांचे म्हणणे असे की गुन्हेगारांना अंध केल्यापासून बिहारमधील गुन्ह्यात लक्षणीय घट झाली आहे!

हे कैदी शिक्षा सुनावलेले कैदी नव्हते. अंडरट्रायल कैदी होते. आज भारतातील तुरुंगात हजारो अंडरट्रायल कैदी आहेत. भागलपूरच्या डोळे काढण्याच्या घटनेने अनेक गोष्टी उघडकीस आल्या आहेत. भारतातील तुरुंगात कैद्यांची काय अवस्था असते ते तर लक्षात येतेच पण कायदा हातात घेण्याची पोलिसांची वृत्ती लक्षात येते. भारतातील कैदी स्त्रियांवरील बलात्काराचे ज्याप्रमाणे त्या स्त्रिया गुन्हेगार होत्या म्हणून समर्थन केले जाते, तसेच समर्थन कैद्यांवरील अत्याचाराचे केले जात आहे. सर्वसामान्य माणसाची सर्व स्वातंत्र्येच आज हिरावून घेतली जात आहेत अशी परिस्थिती आहे! भारतातील तुरुंगात राजकीय कैद्यांचा छळ होतोच. पण इतर कैद्यांच्या छळाच्या कहाण्याही उघड होत आहेत. शासनाचा नामर्दपणाच यावरून ध्यानात येतो. सर्वसामान्य माणसाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.